Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेस नोट दि .२०/ ०३ / २०२१

## बंद घराच्या खिडकीचे गज कापून आत प्रवेश करून घरफोडी चोरी करणा - या टोळीचा पर्दाफाश , एकाला अटक करून पाच गन्हे उघडकीस आणून त्यातील १२ लाख ७८ हजार ४५० रूपयाचे ३३ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त , पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा युनीट ०५ ची कामगिरी .

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालायाच्या हददीत होणाऱ्या घरफोडी चोरीस प्रतीबंध व्हावा व झालेल्या घरफोडीचोरीचे गुन्हे उघडकीस आनावेत या बाबत पोलीस आयुक्त मा श्री कृष्ण प्रकाश सो यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे गूऱ्हे शाखा युनिट ०५ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री रामदास इंगवले यांच्या मार्गदर्शनाखाली सहा . पोलीस निरीक्षक राम गोमारे व गुन्हे शाखा युनिट पाच कडील स्टाफ असे आयुक्तालयातील उघडकीस न आलेल्या गुन्हयाबाबत माहीती घेत असताना सहा पोलीस निरीक्षक राम गोमारे यांना त्यांच्या खास बातमीदार मार्फत बातमी मिळाली की पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत रात्रीच्या वेळी घरांच्या खिडक्यांचे गज कापून आत प्रवेश करून घरफोडी चोरी करणारी टोळी असून त्यातील एक आरोपी हा औरंगाबाद येथील वाळूज परीसरात त्याच्या नातेवाईक यांच्याकडे आश्रयास आहे त्याप्रमाणे वरिष्ठांच्या परवानगीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रामदास इंगवले यांनी सहा . पोलीस निरीक्षक राम गोमारे , पोलीस अंमलदार दत्तात्रय बनसुडे, सावन राठोड, ज्ञानेश्वर गाडेकर व धनंजय भोसले यांचे पथक तयार करून आरोपी शोध घेण्यासाठी पाठविले , वरील टिमने वाळूज परीसरात वेशांतर करून सतत चार दिवस वॉच ठेवून पत्रा कॉलणी वाळूज याठिकाणवरून इसम नाम लिंग्या उर्फ अजित व्यंकप्पा पवार , वय ३० वर्षे , रा जेऊर ता अक्कलकोट जि सोलापुर याला वाळूज पोलीस स्टाफच्या मदतीने ताब्यात घेऊन गुन्हे शाखा युनीट पाच येथे आणून त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने तळेगाव एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन गु.र.क. १३५/२०२० भा.द.वि. कलम ४५७ , ३८० हा गुन्हा त्याने व त्याचे इतर तीन साथीदारांनी मिळुन केला असल्याची कबुली दिली . त्यास सहा.पोलीस निरीक्षक यांनी दि .२७ / ०२ / २०२१ रोजी अटक करून त्याची १३ दिवस पोलीस कोठडी घेऊन तपास केला असता त्याने वरील गुन्हयातील मुददेमाल हा सोने व्यापारी संदिप अंकुश केत , रा सम्राट चौक , अक्कलकोट , जि सोलापुर यास दिला असल्याचे सांगीतलेने दाखल गुन्हयास भा.दं.वि.कलम ४११ हे कलम वाढ करून संदिप अंकुश केत , रा सम्राट चौक , अक्कलकोट , जि सोलापुर यास दि .०४ /०३ /२०२१ रोजी अटक करून त्याची ०६ दिवस पोलीस कोठडी घेऊन त्याच्याकडून सदर गुन्हयातील चोरीस गेलेला खालील वर्णनाचा मुददेमाल जप्त केला आहे .

**१ ) १,०१,२५० / - रू त्यात ४२ ग्रॅम ६५० मि. . वजनाचे सोन्याचे तीन मंगळसूत्र , २ ग्रॅम ५२० मि.ग्रॅ वजनाची सोन्याची एक रिंग अंगुठी आरोपी लिंग्या उर्फ अजित व्यंकप्पा पवार याचेकडून तळेगाव एम.आय.डी.सी. गु.र.क. १३७/२०२१ भा.द.वि. कलम ४५७ , ३८० प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले खालील दागिणे जप्त केले आहे**

**२ ) २,८३,५०० / - रू त्यात २९ ग्रॅम ७७० मि.ग्रॅ . वजनाच्या चार अंगुठया , १२ ग्रॅम १९ मि.ग्रॅ वजनाचे डोरले , ०७ ग्रॅम १८ मि.ग्रॅ.वजनाचे कानातील बेल , ०५ ग्रॅम ५५ मि.ग्रॅ , वजनाचे कानातील टॉप्स , ०३ ग्रॅम वजनाचे तीन बदाम , ०४ ग्रॅम वजनाचे मनगटी , ०३ ग्रॅम वजनाचे कानातील बाली आरोपी लिंग्या उर्फ अजित व्यंकप्पा पवार याचे मदतीने देहूरोड पोलीस स्टेशन गु.र.क्र . ७९६ / २०२० भादविक ४५४ , ३८० प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले खालील दागिणे जप्त केले आहेत .**

**३ ) ३,०८,७०० / - रू त्यात ७८ ग्रॅम ११० मी. ग्रॅ , वजनाची सोन्याची लगड आरोपी लिंग्या उर्फ अजित व्यंकप्पा पवार याचे मदतीने देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.क्र . ६३५/२०२० भादविक ४५४ , ४५७. ३८० प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले खालील दागिणे जप्त केले आहेत .**

**४ ) ५,८५,००० / - रू त्यात ६४ ग्रॅम ७०० मि.ग्रॅ, वजनाचे सोन्याचे गंठण , २० ग्रॅम १० मि.ग्रॅ , वजनाच्या सोन्याच्या दोन चैन , २० ग्रॅम १०० मि.ग्रॅ . वजनाच्या सोन्याच्या चार अंगुठ्या , ३० ग्रॅम वजनाची सोन्याची बांगडी आरोपी नामे लिंग्या उर्फ अजित व्यंकप्पा पवार याचेकडे अधीक सखोल तपास करता त्याने त्याचे इतर तीन साथीदारांनी मिळुन तळेगाव एम.आय.डी.सी. गु.र.क्र . ११/२०२१ भा.द.वि. कलम ४५४ , ४५७ ,३८० हा केला असल्याचे निष्पन झाले असुन सदर गुन्हयामध्ये चोरीस गेलेला माल हा इतर आरोपींकडे असल्याचे समोर आले . आरोपी नामे लिंग्या उर्फ अजित व्यंकप्पा पवार , वय ३० वर्षे , रा जेऊर ता अक्कलकोट जि सोलापुर याच्याकडून एकूण चार गुन्हयातील १२,७८,४५० / - रू किंमतीचे ३३ तोळे वजनाचे सोन्याचे दागीणे जप्त केले आहेत**

तसेच आरोपी नामे लिंग्या उर्फ अजित व्यंकप्पा पवार वय ३० वर्षे , जेऊर ता अक्कलकोट जि सोलापुर हा खालील गुन्हयामध्ये पाहीजे आरोपी आहे .

**१). हिंजवडी पोलीस स्टेशन गु.र.क ५७६/२०२० भादविक ३८० ,**

**२). देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.क्र . १३२/२०२० भादविक ४५४ , ४५७ , ३८०**

**३) भोसरी पो.स्टे . गु.र.क्र , ६०१/२०२० भादविक ४५४ , ४५७.३८०**

**४) चाकण पो . स्टे . गु.र.क्र . ९०३/२०२० भादविक ४५४ , ४५७ , ३८०**

**५).आळंदी पो.स्टे . गु.र.क्र २६७/२०२० भादविक ४५७ , ३८०**

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा.श्री कृष्णप्रकाश , अपर पोलीस आयुक्त मा.श्री.रामनाथ पोकळे , पोलीस उपायुक्त गुन्हे मा.श्री.सुधीर हिरेमठ , पोलीस उपायुक्त परीमंडळ २ मा.श्री.आनंद भोईटे , सहा.पोलीस आयुक्त गुन्हे . १ मा.श्री.प्रशांत अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रामदास इंगवले , सहा.पोलीस निरीक्षक राम गोमारे , पोलीस उपनिरीक्षक प्रसन्ना ज-हाड , पोलीस अंमलदार धनराज किरणाळे , दत्तात्रय बनसुडे , ज्ञानेश्वर गाडेकर , धनंजय भोसले , सावन राठोड , राजेंद्र साळूखे , मयुर वाडकर , नागेश माळी , संदीप ठाकरे , शामसुंदर गुटटे , नितीन बहिरट , दयानंद खेडकर , राजकूमार इघारे , भरत माने , गोपाळ ब्रम्हांदे , गणेश महाडीक , सचीन मोरे , निलम शिवथरे यांनी केली आहे .

